# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे ला. प्र. वि. Police Station | पहिली खबर क्र. 32 FIR No. | वर्ष 2025 Year | दिनांक 10/10/2025 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections 7
 (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from 18/9/25 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 9/10/25 वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 9/10/2025 वेळ Time 20:20

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 1 तारीख Date 10/10/2025 वेळ Time 03:20 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information तक्रार लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. वर्सोवा चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. सात बंगला बिट चौकी क्र. 1

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name वर्सोवा ठिकाणाचे नंबर No. if any स्वदेस रेस्टॉरंट गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place स्वदेस रेस्टॉरंट गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. मुंबई राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name संजय डोळे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name चंद्रकांत डोळे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 62 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9867607757
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
(g) धर्म Religion हिंदू जात Caste चांभार जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address क्रिस्टल CHS गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. 51 फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road गुलमोहोर क्रॉस रोड नं. 11 जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village अंधेरी (प.) पोस्ट Post 400049 पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

रणजित बाळासाहेब चव्हाण वय 50 वर्षे, व्यवसाय- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
रा. ठि.- एक-8, ए. विंग, 701, समाजमंदिर लाइन, प्रतिक्षानगर सायन (प.) मुंबई



Scanned with OKEN Scanner

जबाब दि. १०/१०/२०२५

श्री संजय चंद्रकांत डोळे, वय ६२ वर्षे, धंदा— सेवानिवृत्त (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी), पत्ता — फ्लॅट नं. ५१, क्रिस्टल को ऑप सोसायटी, गुलमोहर क्रॉस रोड क्र. ११, जे व्ही पी डी स्कीम, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०४९ मोबाईल क्र. ९८६७६०७७५७, आधार कार्ड क्रमांक — ५५९७ ६२३३ ५०५२.

———•———

मी वरील प्रमाणे असून, वरनमूद पत्त्यावर गेल्या २० वर्षापासून माझी पत्नी सौ मंजुश्री संजय डोळे वय ६० वर्षे, मुलगा कुणाल वय ३५ वर्षे यांचे सोबत रहातो. माझी पत्नी ही सेवानिवृत्त (प्राध्यापिका) असून, आमचा उदरनिर्वाह दोघांनाही मिळणाऱ्या पेन्शनवर चालतो.

सन २०१७ मध्ये माझी पत्नी सौ मंजुश्री संजय डोळे हिचे नावावर रो हाऊस क्र १०४, जानकीदेवी स्कुल रोड, एस व्ही पटेल नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०००५३. हे खरेदी केले असून, सदर ठिकाणी सध्या शिक्षण घेत असलेल्या विदयार्थिनी व वर्कींग महीला पेईंग गेस्ट म्हणून रहावयास आहेत.

दि. १८/०९/२०२५ रोजी माझे मो.क्र. ९८६७६०७७५७ यावर मो.क्र. ८६५५५८६६५७ वरून सायंकाळी १७.३० वा चे सुमारास मला फोन आला. सदर मोबाईलधारक यांनी त्यांचा परिचय श्री गुलाटी राहणार रो हाऊस नं. १०३, जानकीदेवी स्कुल रोड, एस व्ही पटेल नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०००५३. असा देवून आमचे रो हाऊस क्र १०४ ची पहाणी करण्यासाठी म्हाडाचे साहेब आले असल्याचे सांगून, फोन त्यांच्याकडे दिला. म्हाडाचे अधिकारी यांनी त्यांचा परिचय श्री रणजित चव्हाण अतिक्रमण विभाग, म्हाडा, वर्सोवा असा दिला. त्यानंतर त्यांनी तुम्ही तुमच्या रो हाऊस क्र. १०४ वर अनधिकृत पत्रे चढविलेले आहेत, तसेच, तुम्ही पेईंग गेस्टचा बिझनेस करता, म्हणून तुमच्यावर कारवाई करावी लागेल असे बोलून, मला प्रत्यक्ष भेटण्यासाठी कार्यालयात या असे सांगीतले व संपर्क करण्यासाठी त्यांचा मो.क्र.८९९९१६८३७ वर कॉल करा असे सांगीतले त्याप्रमाणे मी श्री रणजीत चव्हाण यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता, त्यांनी दि. २४/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा चे सुमारास त्यांचा दुसरा मो.क्र. ९८२३१४१२४६ यावरून फोन करून, तुम्ही कार्यालयात न येता मला जानकीदेवी स्कुल रोड, येथिल रो हाऊस नं. ३ मध्ये भेटा. असे सांगीतले. त्याप्रमाणे मी त्यांची भेट घेतली असता. त्यांनी माझे रो हाऊस क्र १०४ वर कोणत्याही प्रकारची कारवाई न करण्यासाठी रू. ४,००,०००/— लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना आम्ही दोघेही पती—पत्नी सेवानिवृत्त असून आम्हाला मिळणाऱ्या पेन्शनमधूनच कर्जाचा मोठा हप्ता कापला जातो. तसेच माझेकडे दुसरा आर्थिक स्त्रोत नसल्याने घरखर्च चालविण्यासाठी आम्ही रो हाऊसमध्ये पेईंग गेस्ट ठेवलेले आहेत. सदर रो हाऊसमध्ये मी कोणतेही अतिरीक्त बांधकाम केले नसून फक्त पत्रे चढविलेले आहेत. व त्यासाठी मला एवढी मोठी रक्कम देणे शक्य नाही. वाटल्यास आम्ही पत्रे काढून घेतो तरी तुम्ही कोणतीही कारवाई करू नका अशी विनंती केली तेव्हा त्यांनी आपण नंतर बोलू असे म्हणून श्री रणजीत चव्हाण तेथून निघून गेले.

त्यानंतर श्री रणजीत चव्हाण हे खरोखर म्हाडा कार्यालय येथे काम करतात की कसे याबाबत मी चौकशी केली असता श्री रणजीत चव्हाण हे कार्यकारी अभियंता वांद्रे यांचे कार्यालयात अतिक्रमण विभागात सहाय्यक या संवर्गात कार्यरत असल्याचे समजले. त्यामुळे मी म्हाडा विभागाचे अधिकृत संकेतस्थळावर पाहून माहीती तपासली असता त्यावर त्यांचे नाव श्री रणजीत चव्हाण पद— स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, जन्मतारीख ०९/११/१९७६,



10-10-2025

Scanned with OKEN Scanner

नोकरी सुरू तारीख २९/०४/२०१६ असे नमुद असून, त्यांचेकडे संपुर्ण वांद्रे विभागातील अतिक्रमण कारवाई करण्यासाठी पोलीस बंदोबस्त, ठेकेदाराला सुचना, व पदनिर्देशित अधिकारी यांना सहकार्य करणे व इतर असे कामकाज नमूद असल्याचे मला दिसले.

दि. ३०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा चे सुमारास श्री चव्हाण यांनी मला कॉल करून भेटण्यासाठी बोलाविले त्याप्रमाणे मी दि. ०१/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वा. चार बंगला अधंरी (पश्चिम) येथील कामधेनू मॉलजवळ श्री चव्हाण यांना भेटलो असता त्यांनी मला म्हटले की, ''मी तुमचे रो हाऊसवर अनधिकृत पत्रे चढविलेले आहेत, तसेच तेथे तुम्ही पेईंग गेस्टचा बिझनेस करता, म्हणून तुमच्यावर कारवाई करणेसाठी रिपोर्ट पाठवायचे थांबविले आहे. तुम्हाला कारवाई होऊ नये असे वाटत असेल तर तुम्हाला मी आधी सांगितले त्याप्रमाणे रू. ४,००,०००/— द्यावे लागतील आता तुम्ही बोला असे बोलले'' त्यावर मी त्यांना सांगीतले की, खरोखरच माझी आर्थिक परिस्थीती रू. ४,००,०००/— देण्यासारखी नाही. तेंव्हा श्री चव्हाण यांनी मग तुम्ही किमान रू २,५०,०००/— तरी द्या असे बोलून लाचेची मागणी केली. ते ऐकूण मी त्यांना रू २,५०,०००/— रक्कम सुध्दा देवू शकत नसल्याचे त्यांना सांगीतले तेव्हा त्यांनी मला दिवाळीपर्यंत रू २,००,०००/— टप्प्याने द्या असे सांगीतले त्यावेळी त्यांचा गर्भीत इशारा व पैशासाठीचा तगादा यामुळे घाबरून मनात नसताना मी त्यांना माझेकडे १० तारखेपर्यंत पैसे येतील तसे तुम्हाला कळवितो असे बोलून वेळ मारून नेली व तेथुन निघून आलो.

दरम्याने मला श्री रणजीत चव्हाण यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि.०८/१०/२०२५ रोजी समक्ष हजर राहून वरिष्ठांची भेट घेवून वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली असता, तेथील अधिकारी यांनी मला लेखी तक्रारअर्ज देण्यास सांगीतले त्यावरून मी त्यांच्याशी चर्चा करून काल दि. ०९/१०/२०२५ रोजी माझा स्वःहस्तलिखीत अर्ज घेवून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे हजर झालो असता सहाय्यक पोलीस आयुक्त श्री मानसिंग पाटील यांनी दोन पंचाना कार्यालयात बोलावून त्यांना माझे अर्जातील हकीकत थोडक्यात समजावून सांगून तक्रारअर्ज वाचावयास दिला. त्यांनंतर माझे तक्रारअर्जावर पोलीस अधिकारी व पंचांनी सही करून तो त्यांच्याकडे ठेवून घेतला. माझे तक्रारीच्या अनुषंगाने पंचासह मला श्री रणजीत चव्हाण यांचे कार्यालयात पाठवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे पोलीस पथक, तसेच, पंच असे आम्ही १३.३० वा. पोलीस वाहनाने ला.प्र.वि कार्यालयातून निघून वर्सोवा मेट्रो स्टेशनजवळ पोलीस वाहने थांबवून सपोआ मानसिंग पाटील हे पोलीस पथक, मला व पंचाना सुचना देत असताना मी श्री रणजीत चव्हाण यांना कॉल केला असता त्यांनी मला भेटण्यासाठी आरामनगर येथील फिशरीज कॉलेजचे मैदाना लगतचे हनुमान मंदीराजवळ यायला सांगितले. सदरची बाब लगेच मी पोलीस अधिकारी यांना सांगीतली असता पोलीस पथक, मी, व पंच असे पायी चालत सुलेमान नाडीयादवाला चौकातील हॉटेल थोरात बारबेक्यू येथे पोहचून सपोआ मानसिंग पाटील यांनी तात्काळ माझे बनियनला आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर लावून आवश्यक सुचना देवून पंच श्री महादेव लादे यांचेसह श्री रणजीत चव्हाण यांनी बोलविलेल्या ठिकाणी जाण्यास सांगीतले. त्यानुसार पंच लादे व मी सुलेमान नाडीयादवाला चौकातील हॉटेल थोरात बारबेक्यू येथून रिक्षाने हनुमान मंदीराजवळ जावून श्री रणजीत चव्हाण यांना भेटलो त्यावेळी चर्चेदरम्यान मी त्यांनी मला मागील भेटीत सांगीतलेली रक्कम देण्यास असमर्थ असून दिड करतो असे बोललो असता श्री रणजीत चव्हाण यांनी आधी सांगीतल्यापैकी काहीच कमी होणार नाही असे बोलले. तेंव्हा मी सध्या माझेकडे ४० असल्याचे सांगीतले व थोडया वेळाने घेऊन येतो असे बोललो तेंव्हा त्यांनी ठिक आहे



Scanned with OKEN Scanner

म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगीतले. ठरल्याप्रमाणे मी पंचासह पोलीस पथक थांबलेले ठिकाण सुलेमान नाडीयादवाला चौकातील हॉटेल थोरात बारबेक्यू येथे आलो असता सपोआ मानसिंग पाटील यांनी माझे बनियनला आतील बाजुस लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. श्री रणजीत चव्हाण यांचे सोबत भेटी दरम्यान झालेले व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण सपोआ मानसिंग पाटील यांनी ऐकून त्यामध्ये रणजीत चव्हाण यांनी मला तुमचे रो हाऊसवर चढविलेले अनधिकृत पत्रे तसेच तेथे तुम्ही पेईंग गेस्टचा बिझनेस करता म्हणून तुमच्यावर कारवाई करणेसाठी रिपोर्ट पाठवायचे थांबविले आहे असे बोलले तेव्हा मी त्यांना कारवाईसाठी रिपोर्ट पाठवू नका अशी विनंती केली तेव्हा ते तुम्ही मराठी आहेत म्हणून मी तुम्हाला मदतच करत आहे आता तुम्हीच बोला असे बोलले तेव्हा त्यांनी लाचेचा पहीला हप्ता म्हणून रू. ४०,०००/— मला घेवून येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाल्याने सपोआ मानसिंग पाटील यांनी मला लाच म्हणून देण्यासाठी रक्कम आणली आहे काय? याबाबत विचारणा केली असता मी ५०० दराच्या एकुण ८० भारतीय चलनातील नोटा असे एकुण रू ४०,०००/— माझेकडून काढून त्यांचे समक्ष हजर केले दरम्याने सपोआ मानसिंग पाटील हे पंचास व मला घ्यावयाचे खबरदारीचे सुचना देत असताना माझे हातून श्री रणजित चव्हाण यांचे मोबाईलवर माझे नकळत फोन लागल्याने मी त्यांच्यासोबत बोलणे केले असता तेव्हा त्यांनी मला किती वेळ लागेल असे विचारले असता मी त्यांना १५ मिनिटात येतो फक्त कुठे येऊ ते सांगा असे विचारले तेव्हा त्यांनी मला हॉटेल स्वदेश जयप्रकाश रोड, सातबंगला येथे रक्कम घेवून येण्यास सांगीतले तसे लागलीच सपोआ मानसिंग पाटील यांचे सुचनेनुसार पोलीस टीमने मला व पंचांना अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगून मी हजर केलेल्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम माझे जवळील पांढऱ्या रंगाच्या प्लास्टीक पिशवीत टाकून ती श्री. रणजीत चव्हाण यांना लाच म्हणून सापळा कारवाईसाठी देण्यासाठी माझे जवळ दिली व श्री. रणजीत चव्हाण यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारताच मी पोलीस पथकास दिसेल अशारीतीने माझे डोळयांवरील चश्मा काढून रूमालाने पुसावा असा इशारा करण्यास मला सुचना दिली व त्यानंतर लगेच सपोआ मानसिंग पाटील यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावून दिला व श्री रणजीत चव्हाण यांनी बोलाविलेल्या हॉटेल स्वदेश या ठिकाणी जाण्यास सांगीतले ते ठिकाण तेथून जवळच असल्याने मी पुढे व माझे मागे पंच महादेव लादे व त्यामागे काही अंतर ठेवून पोलीस पथक असे निघालो.

मी हॉटेल स्वदेश जयप्रकाश रोड, सातबंगला येथे पोहचत असताना हॉटेलच्या समोर श्री रणजीत चव्हाण हे उभे दिसल्याने मी त्यांच्याजवळ जात असताना पंच महादेव लादे हे माझे पासून काही अंतर ठेवून थांबून राहीले मी श्री रणजीत चव्हाण यांचेजवळ गेलो तेव्हा औपचारीकतेची एक दोन वाक्य बोलल्यानंतर मी त्यांना '' नाही जमणार दोन लाख'' असे बोललो तेव्हा चव्हाण मला ''मी तुम्हाला फसवणार नाही'' असे म्हणाले व ''तुम्हाला अस का वाटतयं'' असे बोलले त्यावेळी मी त्यांना ''तसं काय जास्त वाटतय ना म्हणून तर म्हटलं ना'' असे बोललो तसे चव्हाण यांनी मला ''बाकी'' असा शब्द वापरला तेव्हा मी पॅन्टच्या खिशात ठेवलेल्या पैशांवर हात लावून चव्हाण यांना ''देवू'' असे विचारले तसे त्यांनी ''हा'' बोलले तेव्हा मी त्यांना ''पण चाळीस हजार आहेत आता नोटीस वैगेर नोटीस नाही काढणार ना आता?'' असे चिंतेच्या स्वरात विचारले तसे त्यांनी मला ''साहेब मी तुम्हाला शब्द दिलायं असं का करतायं शब्द दिला तुम्हाला,शब्द दिला दिला.'' असे बोलत श्री रणजीत चव्हाण यांनी मान हलवून संमती देवून त्याच्या जवळ असलेल्या बॅगची चैन उघडून मला नजरेने इशारा करून आणलेली रक्कम बॅगेत टाकण्यास खुणावले त्यावेळी माझे पॅन्टच्या डाव्या खिशात असलेली रू ४०,०००/— ठेवलेली पांढऱ्या रंगाच्या पिशवी काढून ती श्री रणजीत चव्हाण यांच्या बॅगेत ठेवली व माझे डोळयांवरील चश्मा काढून रूमालाने पुसण्यास पोलीसांनी मला सांगीतलेला पुर्वनियोजीत इशारा केला तसे तात्काळ पोलीस



Scanned with OKEN Scanner

पथकाने श्री रणजीत चव्हाण यांस त्याच्याकडील बॅगेसह ताब्यात घेतले व तेथून जवळच असलेल्या वर्सोवा पोलीस स्टेशनच्या सात बंगला बिट नं. १ येथील पोलीस चौकी मध्ये सर्व टिमसह जाऊन पंचासमक्ष श्री रणजीत चव्हाण यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत केली.

श्री. रणजीत चव्हाण, स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, म्हाडा, वांद्रे (पुर्व) यांनी माझी पत्नी सौ मंजुश्री संजय डोळे हिचे नाववरील रो हाऊस नं. १०४, जानकीदेवी स्कुल रोड, एस व्ही पटेल नगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०००५३. वर चढविलेली पत्रे व सदर रो हाऊसमध्ये ठेवलेले पेईंग गेस्ट यांच्या संबधाने म्हाडातर्फे कोणतीही कारवाई न करण्यासाठी सर्वप्रथम माझेकडे रू ४,००,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू २,००,०००/- टप्प्याटप्प्याने स्विकारण्याचे मान्य करून लाचेचा पहीला हप्ता रू. ४०,०००/- स्विकारला म्हणून माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री. रणजीत चव्हाण यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मी मराठीमध्ये सांगितली असुन ती माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली व समजावुन सांगितली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( मानसिंग पाटील ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... आज रोजी तक्रार दिल्याने

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... 40,000/- रु. लाचेची रक्कम

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... लागु नाही

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातिल तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे नावावरील रो हाउस वर अनधिकृतपणे पत्रे चढवलेले आहेत व सदर रो हाउस सदनिकेमध्ये तक्रारदार हे पेईंग गेस्टचा अनधिकृतपणे व्यवसाय करत असल्याचा रिपोर्ट वरिष्ठांना पाठवुन कारवाई करावी लागेल असे आलोसे यांनी तक्रारदारास भिती दाखवुन रिपोर्ट न पाठवण्याबद्दल आलोसे यांनी प्रथम 4 लाख रु. व तडजोडीअंती 2 लाख रु. लाचेची मागणी करुन आलोसे यांनी लाचेचा पहिला हप्ता 40,000/- रु. वर्सोवा, मुंबई परिसरात स्विकारला असता रंगेहाथ पकडल्याने गुन्हा दाखल.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. मानसिंग पाटील, स.पो.आ. ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मानसिंग आनंदराव पाटील
पदनाम Rank सहा. पोलीस आयुक्त
तपासिक अ. चा कोड क्र. / Posting ला. प्र. वि. मुंबई
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 10/10/2025
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत / Copy to | 2 फिर्यादी, / 2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), / 3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार, / 4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत. / 5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner

फिर्यादिची फिर्याद हि स्वतंत्र कागदावर
टंकलिखीत केली असुन तिलाच प्रथम
खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे

समक्ष.

(मानसिंग आ. पाटील)
सहाय्यक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि.मुंबई

Scanned with OKEN Scanner